# आरोग्य विभाग

# जिल्हा परिषद ठाणे

*** गोवर रुबेला लसीकरण मोहिम ***



**जिल्ह्याच्या ग्रामीण भागात ४ लाख ९८ हजार बालकांना गोवर व रुबेला लस देणार**

**मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक भीमनवार यांच्या उपस्थितीत मोहिमेचा शुभारंभ**

ठाणे दि २७ नोव्हेंबर: ठाणे जिल्हयाच्या ग्रामीण भागातील ९ महिने ते १५ वर्षाच्या तब्बल ४ लाख ९८ हजार बालकांना गोवर व रुबेला लस देण्यात येणार असून या मोहिमेचा शुभारंभ मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक भीमनवार यांच्या उपस्थितीत भारतीय सैनिकी विद्यालय खडवली येथे झाला. यावेळी उपसंचालक डॉ. गौरी राठोड, कल्याण पंचायत समिती सभापती पांडुरंग म्हात्रे, महिला व बाल विकास अधिकारी संतोष भोसले, गट विकास अधिकारी श्वेता पालवे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.मनिष रेंघे उपस्थित होते.

यावेळी भीमनवार म्हणाले, गोवर व रूबेला लसीकरणा पासून एकही बालक वंचित राहणार नाही यासाठीचे चोख नियोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी मनात कोणतीही शंका संशय न बाळगता आपल्या मुलांना ही लस टोचून घ्यायची आहे. लसीकरणासाठी येणाऱ्या डॉक्टर कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे असे आवाहन ही त्यांनी केले.

या कार्यक्रमा दरम्यान विद्यालयातील विद्यार्थांचे लसीकरण करण्यात आले. लसीकरण केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच या मोहिमेची व्यापक प्रचार प्रसिद्धी व्हावी यासाठी जी.टी. वैद्यकीय महाविद्यालच्या परिचारिकांनी पथनाट्च्या माध्यमातून या मोहिमेची जगजागृती केली.

ही मोहीम पुढील ४ ते ६ आठवडे सुरू राहणार आहे.ग्रामीण भागातील मुरबाड, अंबरनाथ, शहापूर, कल्याण, भिवंडी या पाच तालुक्यातील सर्व खासगी, शासकीय शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र मध्ये लसीकरण करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.तसेच गावे, पुनर्वसित वसाहती, वीट भट्ट्याच्या जागा,आदिवासी भाग याठिकाणी फिरत्या वाहनातून लसीकरण करण्यात येणार असल्याचे आरोग्य विभागाच्या वतीने सांगण्यात आले.


महाराष्ट्र शासन
आरोग्य विभाग
गोवर रुबेला लसीकरण मोहिम
जिल्हा परिषद ठाणे
उद्घाटन - दि. २७ नोव्हेंबर २०१८
SHOT ON MI A1
MI DUAL CAMERA


SHOT ON MI A1
MI DUAL CAMERA